महानगर दंडाधिकारी यांचे न्यायालयात
३६वे न्यायालय, मुंबई सेंट्रल, मुंबई

किरकोळ अर्ज क्र :— १८७/२०१९
गुन्हा नोंद क्र :— ७८८/२०१९.
रेल्वे पोलीस ठाणे :— मुंबई सेंट्रल.

शंकरकुमार दर्शन सिंग. ... अर्जदार.

विरूध्द्

महाराष्ट्र सरकार, ... गैरअर्जदार.
द्वारा — वरिष्ठ पोलीस निरिक्षक,
(रेल्वे पोलीस ठाणे, मुंबई सेंट्रल).

निशाणी क्र.—१ खालील आदेश

अर्जदार नामे शंकरकुमार दर्शन सिंग यांनी सदरचा अर्ज जप्त मुदद्मालाची म्हणजेच एक रेडमी कंपनीचा, काळया रंगाचा मोबाईल मॉडेल क्र ए१ आय.ई.एम.आय. ८६६४१००३९४०३००५ व ८६६४१००३९४०३०१३ चा अंतरिम ताबा मिळवण्यासाठी केला आहे. सदरचा मुदद्माल रेल्वे पोलीस ठाणे, मुंबई सेंट्रल, पोलीसांनी, भारतीय दंड विधान कलम ३९२ अन्वये दाखल गुन्हा नोंद क्र :—७८८/२०१९ अंतर्गत जप्त केला आहे. अर्जदार फिर्यादी आहेत. अर्जदारांचे म्हणने असे आहे की, ते सदर मुदद्मालाचे कायदेशीर मालक आहेत. ते भविष्यात कोणत्याही अपराधात अंतर्भूत होणार नाहीत आणि म्हणूनच ते सदर मुदद्मालाचा अंतरिम ताबा मिळावा म्हणून विनंती करीत आहेत.

२. अर्जदारांनी दाखल केलेल्या फिर्यादीनूसार असे दिसून येते कि, आरोपी नरेंद्र गुप्ताचे, विरूध्द्, गुन्हा नोंद क्र. ७८८/२०१९, रेल्वे पोलीस ठाणे, मुंबई सेंट्रल मुंबई येथे, भारतीय दंड विधान कलम ३९२ अन्वये नोंद झाला आहे. तपासादरम्यान सदर मोबाईल प्राप्त झाला आहे. अर्जदारांनी अर्जाच्या पृष्ठर्थ दाखल केलेल्या इनव्हॉईसद्वारे असे दिसून येते की, सदर मोबाईल त्यांनी दि. ०८/०५/२०१९ रोजी, ₹१२,०००/— ला, श्री बालाजी टेलकॉम, लोअर परेल येथून खरेदी केला आहे. अर्जदारांनी अर्जाच्या पृष्ठर्थ

आधार कार्डची झेरॉक्सप्रत व प्रथम खबरीची झेरॉक्स प्रत, दाखल केली आहे. तपासी अंमलदार व स.स.अ. यांनी त्यांचे म्हणने दाखल केले आहे आणि त्याद्वारे त्यांनी सदरची मुदद्देमाल अर्जदारास परत करण्यासाठी हरकत घेतली नाही. म्हणून असे दिसून येते की, अर्जदार हेच सदर मुदद्देमालाचे कायदेशीर मालक आहेत. अभिलेखावर असलेली कागदपत्रे असे दर्शवितात की, अर्जदार हेच सदर मुदद्देमालाचे कायदेशीर मालक आहेत. करीता अर्जदारांस सदर मुदद्देमालाचा काही अटींवर अंतरिम ताबा देणे योग्य राहिल, सबब खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१ अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२ तपासी अंमलदार यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, त्यांनी सदर जप्त मुदद्देमालाचा म्हणजेच एक रेडमी कंपनीचा, काळया रंगाचा मोबाईल मॉडेल क्र ए१ आय.ई.एम.आय. ८६६४१००३९४०३००५ व ८६६४१००३९४०३०१३ अंतरिम ताबा अर्जदार नामे शंकरकुमार दर्शन सिंग, रा. ठि. महावीरवाला ईमारत, रूम क्र. १०, खडा मंदिर, लोअर परेल (प), मुंबई – ४०० ०१३, यांना खालील अटींवर दयावा.

३ अर्जदार यांनी सदर मुदद्देमाल हस्तांतर, बदल न्यायालयाच्या पूर्व परवानंगी शिवाय बदल करू नये.

४ अर्जदार यांनी सदर मुदद्देमाल भविष्यात इतर गुन्हयांमध्ये व्यस्त करू नये.

५ अर्जदार यांनी ₹१२,०००/. (₹बारा हजार फक्तचे) नुकसानभरपाईचे बंधपत्र पुरवावेत.

६ अर्जदार यांनी सदरची मुद्देमाल जेव्हा आवश्यकता असेल तेव्हा न्यायालयात किंवा तपासी अंमलदार यांच्यासमोर हजर करावी.

७ तपासी अंमलदार यांनी जप्त मुददेमालाचे छायाचित्र सर्वकोनांमधून भविष्यातील त्याच्या ओळखीसाठी मिळवावे.

८ तपासी अंमलदार यांनी दोषारोप पत्रासोबत नुकसानभरपाईचे बंधपत्र या न्यायालयात सादर करावेत.

९ सदरचे प्रकरण, रेल्वे पोलीस स्थानका मुंबई सेंट्रल चे गु. नों. क्र. ७८८/२०१९ च्या रिमांड दस्तासोबत, दोषारोप पत्र दाखल केल्यानंतर, मुख्य प्रकरणामध्ये सामील करणेकामी, ठेववावे.

स्वाक्षरी/—
(जी. पी. बावस्कार)
महानगर दंडाधिकारी,
३६वे न्यायालय, मुंबई सेंट्रल,
मुंबई.

दि.११/०६/२०१९.
सराद.